शुक्रवार, २८ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १९१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड




म्हापसा (गोवा) : ४० सदस्य संख्या असलेल्या गोवा विधानसभेची निवडणूक येत्या १४ फेब्रुवारीला होणार आहे. महाराष्ट्राचे माजी गृहराज्यमंत्री राम शिंदे आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर भारतीय जनता पक्षाने गोवा निवडणुकीची जबाबदारी दिली आहे. गोव्यातील ६-सीओलीम या मतदारसंघात सध्या ते प्रचार करीत आहेत. सोबत भाजप उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी. (अधिक छायाचित्र पान २ वर..)

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# आजपासून पनवेलमध्ये रंगणार महाअंतिम फेरी

***लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह कला दिग्दर्शक नितीन देसाई, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे, या स्पर्धेचे ब्रँड ॲम्बेसिडर ओमकार भोजने यांची लाभणार उपस्थिती***

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी २८ ते ३० जानेवारीपर्यंत पनवेलमध्ये होणार आहे.



कोरोनासंदर्भातील नियमांचे पालन करून पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महाअंतिम फेरी होणार असून कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतलेल्या व्यक्तींनाच प्रवेश असणार आहे. महाअंतिम फेरीचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २८) सकाळी ९ वाजता, तर पारितोषिक वितरण रविवारी (दि. ३०) होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई, तर पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे.

या वेळी सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते विजय केंकरे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुप्रसिद्ध लेखक व अभिनेता संजय मोने, सुप्रसिद्ध लेखक डॉ. नितीन आरेकर, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, सुप्रसिद्ध उद्योजक विलास कोठारी, स्पर्धेचे ब्रँड ॲम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते ओमकार भोजने यांची उपस्थिती असणार आहे.

मराठी रंगभूमीला समृद्ध करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचा या वर्षीपासून जीवन गौरव स्वरूपात 'गौरव रंगभूमीचा' हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असून पहिल्या पुरस्काराने ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धिसागर यांना सन्मानित करण्यात येणार आहे. ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. **(पान २ वर..)**

# आता सुपर मार्केटमध्ये मिळणार वाईन

## ▮ राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय; भाजपची टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाने वाईन विक्रीबाबत मोठा निर्णय जाहीर केला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २७) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील सुपर मार्केटमध्ये आता वाईनची विक्री करता येणार आहे. राज्याचे अल्पसंख्याक विकासमंत्री नवाब मलिक यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर ही माहिती दिली. राज्य सरकारच्या या निर्णयावर टीका होत आहे. भाजपनेही सरकारवर शरसंधान साधले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुपर मार्केट, वॉकिंग स्टोअरमध्ये वाईनच्या विक्रीला परवानगी देण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यावर चर्चेअंती निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारने राज्यात नवे वाईन धोरण राबवण्यावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सरकारने सुपर मार्केटमध्ये वाईन विकण्यास परवानगी दिली आहे. यावर नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

### महाराष्ट्राला 'मद्यराष्ट्र' करण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही -फडणवीस

राज्य सरकारच्या या निर्णयावर विधानसभा विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. त्यांनी ट्विटमध्ये म्हटले की, पेट्रोल-डिझेलऐवजी दारू स्वस्त. दारूबंदी संपवून दारूविक्रीला परवानगी. महाराष्ट्रात नवीन दारूविक्री परवाने देण्याचा निर्णय आणि आता थेट सुपर मार्केट, किराणा दुकानातून घरोघरी दारू. महाराष्ट्राला 'मद्यराष्ट्र' करण्याचा हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. शेतकरी-कष्टकरी, गरीब, बारा-बलुतेदार अशा एकाही घटकाला राज्य सरकारने गेल्या दोन वर्षांच्या कोरोना कालखंडात मदत केली नाही. सरकारचे प्राधान्य केवळ आणि केवळ दारूलाच. महाविकास आघाडीचे हे सरकार नेमके आहे तरी कुणाचे? सत्तेच्या 'नशे'त धुंद सरकारने गरिबांना थोडी तरी मदत करावी.

**"मस्त पियो, खूब जियो हा या सरकारचा मंत्र आहे. हे सरकार पूर्णपणे बेवड्यांना समर्पित आहे. कोरोनामध्ये सर्वसामान्यांना औषधाची आवश्यकता आहे, पण दवा नहीं हम दारू देंगे, महाराष्ट्र को मद्यराष्ट्र बनाएंगे हा या सरकारचा निर्णय आहे. राजकारण करणे आणि दारूवाल्यांना प्रोत्साहन देणे ही यांची भूमिका आहे.**

**-सुधीर मुनगंटीवार, भाजप नेते व माजी मंत्री**

## महाराष्ट्र होणार मास्कमुक्त?

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत कोरोनाचा आलेख उतरणीला लागला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील नागरिक मास्कमुक्त होण्याची शक्यता आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या गुरुवारी (दि. २७) झालेल्या बैठकीत मास्कसंदर्भात चर्चा करण्यात आली.

गेली दोन वर्ष संपूर्ण जग कोरोनाच्या महाभंयकर संकटाचा सामना करीत असून मास्क व अन्य नियमांचीही काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे, परंतु आता तोंडावरून मास्क हटू शकतो. टास्क फोर्सच्या निर्णयानंतर मास्कबाबतीत धोरण जाहीर केले जाणार आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल अवचट यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**

ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल अवचट यांचे गुरुवारी (दि. २७) दीर्घ आजाराने निधन झाले आहे. पुण्यातील पत्रकारनगर येथील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ७८ वर्षांचे होते. दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.




अनिल अवचट यांनी केवळ साहित्यविश्वच नाही, तर समाजातही आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. व्यसनींना भरकटलेल्या मार्गावरून व्यसनमुक्त करीत नव्याने आयुष्य जगता यावे यासाठी त्यांनी मुक्तांगण या व्यसनमुक्ती केंद्राची सुरुवात केली. अवचट हे एक डॉक्टर व पत्रकार होते. त्यांनी समाजसेवेतही मोलाचे योगदान दिले. १९६९मध्ये त्यांनी आपले पहिले पुस्तक 'पूर्णिया' हे प्रसिद्ध केले होते, तेव्हापासून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांवर लिखाण केले. त्यांची ३८हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली. त्यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरांतून शोक व्यक्त होत असून अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## निवडक

### दिल्लीत महिलेवर सामूहिक बलात्कार; चार जणांना अटक

**नवी दिल्ली** : प्रजासत्ताक दिनी राजधानी दिल्लीत महिलेवर बलात्काराची घटना घडली आहे. दिल्लीच्या विवेक विहार परिसरात एका महिलेचे अपहरण करून तिच्यावर सामूहिक बलात्कार व प्राणघातक हल्ला करण्यात आला. धक्कादायक म्हणजे बलात्कारानंतर आरोपींनी पीडितेचे केस कापले व तिची धिंड काढली. या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

### भारताचे दिग्गज हॉकीपटू चरणजीत सिंह यांचे निधन



**उना** : सन १९६४च्या टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या हॉकी संघाचे कर्णधार चरणजीत सिंह यांचे गुरुवारी (दि. २७) निधन झाले. हिमाचल प्रदेशमधील उनामध्ये राहत्या घरी त्यांचे दीर्घ आजारामुळे ते निवर्तले. भारताचे हे माजी मिड फिल्डर ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# पोलिसांच्या सरावावेळी गोळ्या घुसल्या घरात

## अलिबागच्या कार्ले गावात भीतीचे वातावरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथील पोलीस गोळीबार सरावावेळी झाडण्यात आलेल्या बंदुकीच्या गोळ्या कार्ले गावातील दोन घरांमध्ये घुसल्याची घटना गुरुवारी (दि. २७) घडली. सुदैवाने यात कुणी जखमी झाले नाही, मात्र ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, अलिबाग पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी करीत गोळ्या ताब्यात घेतल्या आहेत.



परहूरपाडा येथे गुरुवारी सकाळपासून पोलिसांचा गोळीबार सराव सुरू होता. दुपारी १२.३० ते १च्या दरम्यान दोन डोंगर पार करून एक गोळी मंगेश नाईक यांच्या घराच्या पत्र्यावरून लादीवर पडली, तर दुसरी गोळी प्रफुल्ल पाटील यांच्या पत्र्यावरून भिंतीवर आपटून अंगणात जमिनीवर पडली. या वेळी पाटील यांच्या आई भिंतीला टेकून बसल्या होत्या. सुदैवाने त्यांना कोणतीही इजा झालेली नाही.

अलिबाग तालुक्यातील परहूरपाडा येथे पोलिसांचे गोळीबार सराव क्षेत्र आहे. नवी मुंबई, ठाणे येथील पोलीस बंदुकीतून गोळीबार करण्याचा सराव करण्यासाठी परहूर पाडा येथे येत असतात. या सरावातील गोळीबाराच्या गोळ्या काही वेळा मान तर्फे झिराड ग्रामपंचायत हद्दीतील कार्ले गावात येतात. अशा घटना अनेकदा घडल्या आहेत. याबाबत ग्रामस्थांनी पोलीस, जिल्हा प्रशासन यांना अनेक निवेदने दिली. त्यानंतर गोळीबार सरावाच्या ठिकाणी २० फुटाची भिंत बांधण्यात आली, पण तरीदेखील गोळ्या कार्ले गावात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

# प्रा. एन. डी. पाटील यांचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल

## ▪ लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे उद्गार

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व माजी चेअरमन प्रा. एन. डी. पाटील सर आपल्या मनात कायमचे ठसलेले आहेत. त्यांचे काम पुढे नेण्यासाठी सतत जागृत राहूया हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे उद्गार रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी काढले. ते नवी मुंबईत आयोजित आदरांजली कार्यक्रमात बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये प्रा. एन. डी. पाटील यांच्या निधनानिमित्त आदरांजलीच्या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच (दि. २५) करण्यात आले होते.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास महाविद्यालय विकास समितीचे सदस्य दशरथशेठ भगत, ॲड. पी. सी. पाटील, मलकापूरच्या डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व अन्वय संस्थेचे संस्थापक डॉ. अजित मगदूम, प्रसिद्ध लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदूम, तसेच नंदलाल आहेर, राजू (विक्रम) शिंदे, अजय वाळूंज, प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य प्राध्यापक सी. डी. भोसले, ए. बी. वाघ, मनीषा काळे, पत्रकार महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, मॉडर्न स्कूलचे व्यवस्थापन समिती सदस्य, तसेच विद्यालय व महाविद्यालयातील शिक्षकवृंद, कर्मचारी कोरोना नियमांचे पालन करून उपस्थित होते. मान्यवरांनी प्रा. 'एनडीं'ना आदरांजली अर्पण केली.

आपले विचार व्यक्त करताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, एन. डी. सरांना दुःखी चेहरे केव्हाही आवडत नसे, कारण त्यांना वाटायचे की सर्वांनी आनंदात व सुखात राहिले पाहिजे. एन. डी. सर हे सर्वांचे होते. ते स्पष्टवक्ते होते आणि गोरगरिबांसाठी सतत झटत असत. एन.डी. सरांचा माझ्यावर खूप मोठा आधार व आशीर्वाद होता. अन्य मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करून एन. डी. पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला.

# पनवेल महापालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर भर

## प्रजासत्ताक दिन सोहळ्यात महापौर डॉ. कविता चौतमोल यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर पनवेल शहराबरोबरच महापालिका क्षेत्रात समाविष्ट झालेल्या गावांच्या विकासालाही गती मिळत असून महापालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात आहे, असे प्रतिपादन महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात केले.





पनवेल महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज मैदानावर बुधवारी (दि. २६) महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी पुढे बोलताना डॉ. चौतमोल यांनी कोरोना महामारीच्या संकटावर आपण यशस्वीपणे मात करीत आहोत. स्वच्छ भारत सर्वेक्षणामध्ये आपल्याला मिळालेल्या यशामध्ये नागरिकांचा खूप मोठा वाटा आहे, असे सांगून याबद्दल त्यांनी नागरिकांचे आभार मानले. आपण या वर्षी स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत असून आजपासून लोकशाही पंधरवडा साजरा करत आहोत. लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांनी मतदार नोंदणी करणे व मतदानाचा हक्क बजावणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सोहळ्याला उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस श्रीनंद पटवर्धन, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, **(पान २ वर..)**

# शिवसेनेने आम्हाला निष्ठा शिकवू नये

## राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरेंची जहरी टीका

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत निवडणुकीत झालेला पराभव राष्ट्रवादीच्या चांगलाच जिव्हारी लागला असून निजामपूर येथे बुधवारी (दि. २६) आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात बोलताना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस व खासदार सुनील तटकरे यांनी शिवसेनेच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली.

राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस हे तीन पक्ष महाविकास आघाडी सरकारमध्ये एकत्र असले, तरी रायगड जिल्ह्यात शिवसेना व राष्ट्रवादी यांच्यात आपापसात मतभेद आहेत. माणगाव नगरपंचायत निवडणुकीच्या निमित्ताने हा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. माणगावमध्ये शिवसेना व मित्र पक्षांच्या आघाडीने सत्ताधारी राष्ट्रवादीला पराभूत केले आहे.



राष्ट्रवादीच्या निजामपूर येथे झालेल्या मेळाव्यात खासदार सुनील तटकरे यांनी भविष्यात रायगड जिल्ह्यातील राजकारणात शिवसेनेसोबत दोन हात करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. त्यामुळे आता जिल्ह्यात पुन्हा एकदा राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना असा सामना रंगणार आहे. दरम्यान, याबाबत शिवसेना काय भूमिका मांडते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुकापूरच्या उपसरपंचपदी दिवेश भगत यांची बिनविरोध निवड

**पनवेल : रामप्रहर वत्त**

सुकापूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक गुरुवारी झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे दिवेश दत्तात्रय भगत यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित उपसरपंच दिवेश भगत यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, सरपंच योगिता पाटील, माजी उपसरपंच आशोक पाटील, दत्तात्रय भगत, आकुर्लीचे सरपंच सचिन पाटील, माजी सरपंच आलुराम केणी, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, भाजप नेते राजेश पाटील, मोनिका खुटले, विभागिय अध्यक्ष किशोर सुरते, पाली देवद पंचायत सिमिती अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, सदस्य महेश पाटील, चंद्रकांत पोपेटा, चेतन केणी, पुष्पा म्हस्कर, अनिता पाटील, पूनम भगत, प्राची जाधव, कविता पोपेटा, ज्योती केणी, आत्माराम पाटील, सुरेश मुकादम, उदय म्हस्कर, डॉ. कृष्णा देसाई, पंकज पोपेटा, मधुकर पोपेटा, अनिकेत पाटील, हनुमंत खुटले, यतीन पाटील, प्रमोद भगत आदी उपस्थित होते.



**कामोठे : येथील जवाहर इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये बाळाराम चिपळेकर यांनी श्री गणेश कृपा नावाने हॉटेल व्यवसाय सुरू केला आहे. या हॉटेलचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन झाले. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, नगरसेवक दिलीप पाटील, विकास घरत, विजय चिपळेकर, विठोबा गायकर, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, अतुल गोवारी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : तालुकास्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेत गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता सातवीची विद्यार्थिनी दीक्षा वर्तक हिने लहान गटात (पाचवी ते सातवी) प्रथम क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल प्रजासत्ताक दिनी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते दीक्षाचा सन्मान करण्यात आला.**



**पनवेल : महापलिकेच्या प्रभाग क्रमांक १९मधील कोळीवाडा परिसराची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी पाहणी केली. या वेळी त्यांनी शौचालय, स्वच्छता, ड्रेनेज लाईन यांसारख्या नागरी समस्यांची महिती घेऊन अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शन भोईर, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, दत्ता हारू भगत, एकनाथ भोईर, महापालिकेचे कर्डिले आदी उपस्थित होते.**



**म्हापसा (गोवा) : पनवेलच्या पत्रकारांनी गोवा दौऱ्यादरम्यान येथील विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जबाबदारी दिलेले महाराष्ट्राचे माजी मंत्री राम शिंदे आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची म्हापसा येथील भाजपच्या मुख्य कार्यालयात भेट घेतली व त्यांच्याशी संवाद साधला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पनवेलचे माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा आदी उपस्थित होते.**





**कमोठे : येथील श्रीजी रेसिडेन्सी, साई लीला, साई लोचन आणि चंद्रदर्शन सोसायटीच्या विविध समस्या सोडवल्याबद्दल सभागृह नेते परेश ठाकूर आणि प्रभाग समिती 'क'च्या नवनिर्वाचित सभापती अरुणा भगत यांचा बुधवारी सत्कार करण्यात आला. या वेळी समाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, प्रदीप बडे, वसंत जाधव, आदर्श शिक्षका पुरस्कार विजेत्या विजया सरगर, विनोद कदम, निकम, शीतल शिंदे, रूपाली जाधव, रामदास पोपळघर, महिंद्र सूर्यवंशी यांच्यासह रहिवासी उपस्थित हते.**



**कामोठे : स्वर्गीय दि. बा. पाटील मैदानात स्व. मितेश जोशी यांच्या स्मरणार्थ श्री गणेश इलेव्हन संघाच्या वतीने 'श्री रवीशेठ जोशी सन्मान चषक २०२२' क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेला पनवेल महापलिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी भेट दिली. या वेळी माजी उपमहापौर व स्थायी समिती सदस्य जगदिश गायकवाड, नगरसेवक नितीन पाटील, विकास घरत, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, युवा नेते हॅप्पी सिंग, रमेश तुपे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष चिन्मय समेळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.**





**पनवेल : महानगरपालिकेच्या गुजराती शाळा, कोळेश्वर शाळा, कन्या शाळा येथे नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सोबत इतर मान्यवर व नागरिक.**



**खारघर : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलच्या वतीने २६ जानेवारी रोजी खारघरमध्ये १० किमी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. खारघर प्रभाग समिती 'अ'च्या कर्मचाऱ्यांनी या सायकल रॅलीमध्ये सहभाग घेतला. रॅली यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलच्या वतीने त्यांना पदक व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.**

## पान १ वरून

## आजपासून पनवेलमध्ये रंगणार महाअंतिम फेरी

स्पर्धेतील प्रथम क्रमांकास एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा नाट्यरसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष व महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, स्पर्धा सचिव श्यामनाथ पुंडे, सीकेटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस. के. पाटील यांनी केले आहे.

नाट्यचळवळ वृद्धिंगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे पुढे चालत राहावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष व महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत आला आहे.

आतापर्यंत झालेल्या या स्पर्धेला रमेश सिप्पी, प्रेमानंद गज्वी, गंगाराम गवाणकर, जयंत सावरकर, जयवंत वाडकर, केदार शिंदे, अंकुश चौधरी, जयवंत वाडकर, आदिती सारंगधर, किरण जुनेजा, प्रदीप मुळे, राजन ताम्हणे, समीर खांडेकर, राजन भिसे, शर्वाणी पिल्ले, क्रांती रेडकर, विजय चव्हाण, विजय कदम, विजू खोटे, अविनाश खर्शीकर, संजय नार्वेकर, ऋतुजा देशमुख, मनोज जोशी अशा नाट्य व सिनेसृष्टीतील अनेक दिग्गजांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे.

स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि., तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे. पहिल्या दिवशी नऊ एकांकिका सादर होणार आहेत. निशुल्क प्रवेशिकेसाठी अभिषेक पटवर्धन (९०२९५८०३४३) किंवा चिन्मय समेळ (८७६७१४९२०३) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

*** अशी आहेत पारितोषिके ***

प्रथम क्रमांक एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ एकूण दोन बक्षिसे प्रत्येकी पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

*** सर्वोत्कृष्ट अभिनेता (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट लेखक (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट संगीत (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट नेपथ्य (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना (वैयक्तिक) ***

प्रथम क्रमांक दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** रायगड जिल्हा प्राथमिक फेरीकरिता विशेष पारितोषिके ***

प्रथम क्रमांक १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक सात हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

*** अंतिम फेरीकरिता विशेष पारितोषिके ***

सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका, लोककलेवर आधारित एकांकिका, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार व बाल कलाकार यांनाही विशेष पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

*** तीन दिवसांत सादर होणाऱ्या एकांकिका ***

सेल नसलेला रेडिओ (नूतन मराठा कॉलेज, जळगाव), पहाटेचा मृत्यू (अंभृणी सेवा संस्था, नागपूर), सूर्याची सलामी (व्हीएमव्ही कॉलेज, नागपूर), माझी बाजू माझा पक्ष (डॉ. विठ्ठलराव खोब्रागडे शिक्षण संस्था, नागपूर), स.न.वि.वि. (देवल क्लब, कोल्हापूर), विषाद (रंगपंढरी, पुणे), आय ॲग्री टू (आमचे आम्ही पुणे, पुणे), चिऊताई चिऊताई दार उघड (स्पॉट लाईट पनवेल, पुणे), त्रिशंकू (कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण, रायगड), गुज (फ्रायडे, अलिबाग, रायगड), पार्वती सदन– १०५ अ, ब, क (सी. के. ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, रायगड) हायब्रीड (ॲबस्ट्रॅक्ट थिएटर, मुंबई), मानलेली गर्लफ्रेंड (इंद्रधनू, मुंबई), साबण (मृदा, कल्याण), राकस (कलासक्त, मुंबई), प्रसाद (रुईया कॉलेज, मुंबई), बेकलाइटी बेकलाइटी (मिथक, मुंबई), जनावर (प्राण, मुंबई), ए वन (माध्यम कलामंच, मुंबई), मौनांतर (नागाबादेवी कलामंच, वसई), व्हेन सुमेध मिट्स राधिका (फोर्थ वॉल, ठाणे) बिलिमारो (ढ मंडळी, कुडाळ), मनस्वीनी (निर्माती, वसई), तिडीक (प्रमुख थिएटर्स, मुंबई), लेखक (कल्लाकार्स थिएटर, ठाणे).

## पनवेल महापालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासावर भर

प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, प्रमिला पाटील, नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, समीर ठाकूर, मुकिद काझी, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, सुशीला घरत, राजेश्री वावेकर, आरती नवघरे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, भाजप कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष चिन्मय समेळ यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल, पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले, तसेच ध्वजाला मानवंदना दिली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नियमांचे काटेकोर पालन करीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला.




**खारघर : कोकण दर्पणचा अकरावा वर्धापन दिन प्रजासत्ताक दिनी खारघर येथील सत्याग्रह कॉलेज सभागृहात झाला. उपस्थितांच्या हस्ते कोकण दर्पणच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण समिती सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती 'अ'च्या सभापती संजना कदम, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेविका नेत्रा किरण पाटील, भाजप नेते समीर कदम, किरण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा उपाध्यक्षा प्रतीक्षा कदम, पत्रकार मुकेश शिंदे, शरद सावंत आदी उपस्थित होते.**





**पनवेल : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ८ मध्ये प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, सरचिटणीस दिलीप बिष्ट, स्वच्छता अभियानचे आयोजक संतोष गायकवाड, उपाध्यक्ष संदीप भगत, प्रियांका पवार, अंजली पाटकर, राजू दळवी, महापालिकेचे श्री. कवठे यांच्यासह स्वच्छतादूत उपस्थित होते.**



# स्वातंत्र्यसैनिकांच्या उत्तराधिकाऱ्यांचा पनवेल महानगरपालिकेतर्फे सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील हुतात्मा स्मारक उद्यानात ७३व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वातंत्र्यसैनिकाच्या नातेवाईक सुनीता दत्तात्रेय गोखले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. रायगड सुरक्षा रक्षक मंडळाच्या जवानांनी ध्वजाला मानवंदना दिली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने स्वातंत्र्य चळवळीतील समोर न आलेल्या योद्ध्यांचा सन्मान करण्यात आला.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्रसैनिकांच्या उत्तराधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शहरातील हुतात्मा स्मारक मैदानात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी स्वातंत्र्य चळवळीतील सुमारे ३० उत्तराधिकाऱ्यांना ओळखपत्र, शाल, श्रीफळ, भेटवस्तू देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक माजी नगरसेवक अशोक खरे यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती वृषाली वाघमारे, आयुक्त गणेश देशमुख, तहसीलदार विजय तळेकर, नगरसेविका दर्शना भोईर, चारुशीला घरत, रुचिता लोंढे, उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, आयुक्त सुवर्णा दखणे आदी उपस्थित होते.





उलवे नोड : येथील सेक्टर १५मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त इत्तेहाद एज्युकेशन फाऊंडेशन आणि वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने ध्वजारोहण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तसेच त्यांनी रक्तदान शिबिराला भेट दिली. या वेळी वहाळ येथील साई संस्थानचे अध्यक्ष रवीशेठ पाटील, जि.प. सदस्य रवींद्र पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगीता भगत, अनंताशेठ ठाकूर, भाजपचे कोपर गाव अध्यक्ष सुधीर घरत, किशोर पाटील, काशिनाथ पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. (छाया : लक्ष्मण ठाकूर)




कळंबोली : येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी कळंबोली शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, शहर मंडल सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, शहर उपाध्यक्ष संदीप भगत, राजू, प्रभाग ८चे शक्ती केंद्र प्रमुख श्रीकांत ठाकूर, राजू दळवी, शहर दिव्यांग सेलचे अध्यक्ष दत्तात्रय भिसे, शहर सचिव संतोष गायकवाड, सतीश गरजे, कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल, सचिन कांबळे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, उपाध्यक्ष प्रियांका पवार, युवा मोर्चा सरचिटणीस श्वेता नगराळे, सुलभा साखरे, यशोदा लव्हटे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



नवीन पनवेल : येथील सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त खांदा कॉलनी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी संस्थेच्या मुख्य संचालिका ग्रेस पिंटो, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



उलवे : प्रजासत्ताक दिनानिमित्त उलवे सेना सामाजिक संस्था, उलवे नोडच्या पदाधिकाऱ्यांनी आणि सभासदांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या वेळी उलवे सेनेच्या सभासदांतर्फे उलवे नोडसाठी क्रीडांगणाची मागणी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे करण्यात आली.




खारघर : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बुधवारी पनवेल महापालिका, दुर्गामाता फेरीवाला संस्था, खारघर डॉक्टर असोसिएशन व खारघर साऊथ इंडियन सेलच्या वतीने महारक्तदान आणि लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली व रक्तदान करणाऱ्या नागरिकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, नगरसेवक संतोष शेट्टी, निलेश बावीस्कर, प्रभाग समिती 'अ'च्या सभापती संजना कदम, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष चिन्मय समेळ, समीर कदम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



खारघर : भाजप खारघर मंडलच्या वतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी भारतीय सैन्यात सेवा बजावणारे खारघर शहरातील निवृत्त सेना अधिकारी ऑनररी लेफ्टनंट चंदरभान, मोहनसिंग, कमांडर रामकुमार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी खारघर शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, नगरसेविका नेत्रा पाटील, हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेवक गुरुनाथ गायकर, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, जिल्हा उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, सोशल मीडिया जिल्हा सहसंयोजिका मोना अडवाणी, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, रमेश महेंद्रू, ॲड. बाबर, प्रसिद्धीप्रमुख प्रभाकर बांगर, युवा सरचिटणीस अमर उपाध्याय, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, उत्तर भारतीय संयोजक विनोद ठाकूर, युवा मोर्चा जिल्हा सदस्य अक्षय राणे, विलास आलेकर, शिक्षक सेल संयोजक संदीप रेड्डी, वैद्यकीय विद्यार्थी आघाडी संयोजक विजय उजळंबे, ज्येष्ठ नागरिक सेल संयोजक नवनीत मारू, भरत कोंढाळकर, विपुल चौतालिया, आयटी सेल संयोजक रूपेश चव्हाण, वैद्यकीय मंडल संयोजक किरण पाटील, गुरुनाथ म्हात्रे, अरविंद जाधव, अशोक जांगिड, विजय बागडे, जयंती भगत, अंकिता वारंग, स्मिता आचार्य, प्रिया दळवी, शोभा मिश्रा, मंजुळा भगत, शारदाबेन पटेल, मीनाक्षी बेन, ओबीसी सेल सहसंयोजिका वैशाली प्रजापती, सीमा खडसे, अनिल खोपडे, भगवान पंजाबी, गंगाधर जाधव, अरविंद थापलू, राजीव दुबे, आरएसएस कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



पनवेल : येथीलम पीर करमअली शा ऊर्दू शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त नगरसेवक मुकीद काझी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



पनवेल : नादब्रह्मा साधना मंडळाच्या वतीने खारघर रांजणपाडा येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या वेळी भजनसम्राट ह.भ.प. निवृत्तीबुवा चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी रायगडभूषण उमेश चौधरी, ॲड. यशवंत भोपी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.



पनवेल : भाजप युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष व नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या जनसेवा कार्यालयासमोर प्रभागातील ज्येष्ठ नागरिक राजकुमार ताकमोघे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तसेच ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. या वेळी माजी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, प्रभाग अध्यक्ष चंद्रकांत पाटील, अरुण गद्रे, अजय भाटवडेकर, देविदास खेडकर, सचिन कुलकर्णी, रोहन वाजेकर, दुर्वांक कामेरकर, संकेत शेटे, वसुधा सोलंकी, स्वाती पवार, रीमा रावल, हर्षा ठक्कर, उदय पाटील उपस्थित होते.



सुकापूर : येथील अयप्पा मंदिराजवळ श्री स्वामी समर्थ मठाचे भूमिपूजन आणि वृक्षारोपण बुधवारी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, महेश पाटील, राजेश पाटील, बुवाशेठ भगत, ज्ञानेश्वर पाटील, ग्रामपंचायत सदस्य चेतन केणी, प्राची जाधव, पूनम भगत, डॉ. कृष्णा देसाई, किरण गावडे, राजा क्षीरसागर, नितीन वाडेकर, जयवंत बाबरे, जयेश पाटील, पंकज पाटील, दिनेश पडळकर, चेतना पाटील, कविता पाटील, जयंती वाडेकर, वर्षा शिंदे आदी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा







**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या वेळी जभशिप्र संस्थेचे सदस्य संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, प्रभाकर जोशी, दीपक शिंदे, सचिन वासकर, जयदास तेलवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर रामशेठ ठाकूर कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या दुर्गोदेवी मौर्या, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. नमिता अखौरी यांने केले. या वेळी प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी प्रजासत्ताक दिन, संविधानाचे हक्क व त्याच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सफिना मुकादम यांनी केले, तर प्रा. प्रवीण सावे यांनी आभार मानले.





पनवेल : प्रजासत्ताक दिन नवीन पनवेल सेक्टर ९ येथील बिनेदार कॉर्नरजवळील भाजप जनसंपर्क कार्यालय तसेच आम्रपाली बुद्धविहार येथे बुध्दगया प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी भाजपचे आणि बुध्दगया प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सभासद बंधू-भगिनी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायमस्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १४ | १ | ०-५६-३०<br>पो.ख. ०-१०-८०<br>एकूण ०-६७-१०<br>विक्री क्षेत्र ०-२७-० | ६.१९ | श्री. अनंत काशिनाथ भालेकर |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- २७/०१/२०२२**

सही/-
**ॲड. एस. के. राणे**
पत्ता : ऑफीस नं. १२३, पहिला मजला,
म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ,
पनवेल, जि. रायगड, मो.नं. ९८१९८६९२१२

## संपादकीय

### दारू(ण) प्रेम!

महाविकास आघाडी सरकारच्या दारूविषयक उदार धोरणाला हास्यास्पद म्हणावे की संतापजनक हेच कळत नाही. गेली दोन वर्षे महाराष्ट्राची जनता कोरोना विषाणूशी प्राणपणाने झगडते आहे. कोरोनाविषयक जाचक निर्बंध आणि मृत्यूची टांगती तलवार या दोहोंमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले आहे. शिक्षणक्षेत्रापासून शेतकऱ्यांपर्यंत आणि व्यापाऱ्यांपासून कामगारांपर्यंत समाजातील सर्वच घटक आर्थिक चणचणीमुळे बेजार झाले आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकार निव्वळ दारूच्या बाबतीत एवढे उदार धोरण स्वीकारताना दिसते हे अनाकलनीय आहे.

**कुठल्याही देशाची किंवा राज्याची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी अनेक कडू-गोड निर्णय घ्यावे लागतात. त्यातील काही निर्णय अर्थातच अप्रिय ठरतात तर काही निर्णयांमुळे समृद्धीच्या दिशेने सामूहिक वाटचाल सुरू राहते, परंतु असे निर्णय घेण्यापूर्वी त्यावर प्रगल्भपणे विचारमंथन होणे अपेक्षित असते. त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींशी पुरेशी चर्चा केल्यानंतरच प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला जातो. त्यावर पुन्हा एकदा साधकबाधक चर्चा झाल्यानंतरच धोरणात्मक निर्णय घेतले जातात. लोकशाही व्यवस्थेत ही सर्वमान्य प्रक्रिया आहे, परंतु महाराष्ट्रात सध्या नेमके कोणाचे राज्य आहे हेच कळत नसल्यामुळे ही सर्व प्रक्रिया कशी आणि कोणी पार पाडावी हाच मुळात पेच निर्माण झाला आहे. गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्याच्या नव्या द्राक्ष प्रक्रिया धोरणाबाबत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात गैर असे काहीच नाही. २००१ साली पहिल्यांदा महाराष्ट्रात द्राक्ष प्रक्रिया धोरण ठरवण्यात आले. ते २० वर्षांसाठी होते. या धोरणाचा कार्यकाल संपल्यानंतर त्यात कालसुसंगत बदल करणे क्रमप्राप्त होते. नव्या धोरणानुसार महाराष्ट्रातील किराणाभुसार दुकानांमध्ये किंवा सुपरमार्केटमध्ये वाईनची राजरोस विक्री करण्याची मुभा लवकरच देण्यात येणार आहे. त्यासाठी कुठल्याही किचकट परवान्यांची गरज लागणार नाही. अबकारी करापोटी वाईनच्या बाटलीमागे १० रुपये राज्य सरकारच्या तिजोरीत जमा केले की विनासायास बाटली घरी नेता येऊ शकेल. या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीत दरमहा पाच-दहा कोटी रुपयांची भर पडेलच, शिवाय राज्यात वाईनला मागणी किती आहे याचाही मागोवा घेता येईल अशी महाविकास आघाडी सरकारची धारणा आहे. कोरोना काळामध्ये पहिल्या लॉकडाऊनच्या काळात सर्वच दुकाने बंद राहिली होती. त्यातील दारूची दुकाने सर्वात आधी उघडली गेली. व्यायामशाळा आणि केशकर्तनालये उघडण्यासाठी सरकारने प्राधान्य दाखवले नव्हते. अर्थव्यवस्था रूळावर आणण्यासाठी दारूविक्रीला सवलत देणे आवश्यक आहे हा युक्तिवाद तेव्हा सरकारतर्फे करण्यात आला होता. परदेशी दारूविक्रीबाबत औदार्य दाखवणाऱ्या महाविकास आघाडी सरकारने आता वाईनच्या बाटल्या कोपऱ्यावरील किराणा दुकानापर्यंत आणून ठेवल्या आहेत. जिथे अन्नधान्य किंवा जीवनावश्यक वस्तू मिळतात अशा ठिकाणी वाईनच्या बाटल्यांचे काय काम, हा साधा प्रश्नदेखील राज्य सरकारला पडला नाही. किराणामालाच्या दुकानांमध्ये वाईन विक्रीसाठी ठेवल्यास सरकारी तिजोरीत थोडीफार भर पडेलही, परंतु या निर्णयामुळे होणारे सामाजिक नुकसान रोखण्याची क्षमता या सरकारच्या मनगटात आहे काय, हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादकांकडे काही लाख लिटर वाईन पडून आहे. शेतकऱ्यांची मिळकत दुप्पट करण्यासाठी ही उपाययोजना केली जाते आहे असे सांगितले जाते, परंतु अशा प्रकारचे निर्णय घेण्यापूर्वी योग्य तो अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे. त्या अभ्यासूवृत्तीचा संपूर्ण अभाव या निर्णयातून दिसतो.**

# मळा गावाला रस्ता केव्हा मिळणार?



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रस्ते हे विकासाचे साधन आहे. जेथे रस्ता आहे, तेथे विकास होतो. त्यामुळे गाव तिथे रस्ता हे शासनाचे धोरण आहे. प्रत्येक गाव रस्त्याने जोडाले गेले पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे. देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे, तरीदेखील अनेक गावांमध्ये आजही रस्ते नाहीत. रायगड जिल्ह्यातील अलिबाग हा प्रगत तालुका आहे. या तालुक्यातदेखील काही गावांमध्ये रस्ते नाहीत. त्यापैकी एक गाव आहे मळा. गेली चाळीस वर्षे येथील ग्रामस्थ रस्त्यासाठी संघर्ष करत आहेत. परंतु या गावात रस्ता होऊ शकलेला नाही. जर अलिबाग तालुक्यातील गावाची ही आवस्था असेल तर इतर दुर्गम तालुक्यातील गावांची काय गत असेल, याचा विचार केला पाहिजे. रस्त्यासाठी जागा देण्यास काही शेतकऱ्यांचा विरोध आहे. तेथील लोकप्रतिनिधी व प्रशासनाने या शेतकऱ्यांशी संवाद साधून रस्त्याचा मार्ग मोकळा केला पहिजे.

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार ग्रुपग्रामपंचायत हद्दीत मळा हे ४० घरांचे दिडशे लोकसंख्या असलेले गाव आहे. मिळकतखार गावातील काही ग्रामस्थांनीच गावात घरे बांधण्यासाठी जागा नसल्याने शेतावर आपले घर बांधले आणि मळा हे गाव वसले. २००२-०३ साली नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास अंतर्गत साडे दहा लाख रुपये खर्च करून गावात जाणारा रस्ता बांधला होता. मात्र मळा गावाच्या वेशीवर शेती असल्याने बांधावरून जाणारा रस्ता अपूर्णच ठेवला आहे. काही शेतकऱ्यांचा रस्त्यासाठी जागा देण्यास विरोध आहे.

गावात रस्ता नसल्यामुळे ग्रामस्थ आजारी व्यक्ती, गरोदर माता यांना उचलून मुख्य रस्त्यापर्यंत घेऊन जातात. त्यानंतर त्यांना वाहनाने रुग्णालयात नेत आहेत. पाण्याचीही समस्या मोठी असल्याने गावात नळ असूनही आठ दिवसाने पाणी येत आहे. रस्ता नसल्यामुळे टँकर गावात पोहचत नाही. टँकरचे पाणी आणण्यासाठी एक किलोमीटर अंतरावरून महिलांना डोक्यावर हंडा घेऊन शेताचा बांध तुडवत घरी यावे लागते. पावसाळ्यातही रस्ता नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विजेचीही समस्या गावात भेडसावत आहे. गावात घराचे काम करायचे झाल्यास अनेक अडचणी येतात. मोठे वाहन गावात येऊ शकत नाही. गावात जाणारा रस्ता नसल्याने चारचाकी वाहनेही ग्रामस्थांना गावाच्या बाहेर ठेवावी लागत आहेत. शाळकरी मुलांनाही शेताच्या बांधावर कसरत करत शाळेत जावे लागत आहे. केवळ रस्ता नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना मळा ग्रामस्थांना करावा लागत आहे.

गावात येणारा रस्ता शेताच्या बांधावरून येणारा आहे. अर्धा रस्ता झाला आहे. त्याचीदेखील दुरावस्थ झाली आहे. रस्ता नसल्याने गावाचा विकास खुंटला आहे. ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शेतांच्या बांधावरून गावात जावे लागते. हाच रस्ता रूंद करून गावाला चांगला रस्ता करावा, अशी येथील जनतेची मागणी आहे. परंतु काही शेतकऱ्यांचा रस्त्यासाठी जमीन देण्यास विरोध आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी यांनी एकत्र बसून यावर चार्चा करून मळा गावात रस्ता नेण्यासाठी मार्ग काढला पाहिजे.

## बोडणीतील महिलांची पाण्यासाठी वणवण

अलिबाग तालुक्यातील बोडणी हे चार हजार लोकवस्तीचे गाव आहे. या गावाला डिसेंबर महिन्यातच पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. ही नळपाणी पुरवठा योजना सातत्याने नादुरूस्त असते. त्यामुळे पाणी गावात पोहोचतच नाही. या गावातील महिलांना पाण्यासाठी रात्र-रात्र जागून काढावी लागत आहे. दुसऱ्या गावात जावून फुटलेल्या जलवाहिनीवरून पाणी भरावे लागत आहे.

सध्या गावात पाण्याची कुठलीच सोय नाही. त्यामुळे इथल्या महिलांना रात्रभर जागून दूरवर जावून पाणी भरावे लागत आहे. फुटलेल्या जलवाहिनीवरून पाणी भरण्याची वेळ या महिलांवर आली आहे. इथं पाणी भरण्यासाठी रात्री उशिरापर्यंत अक्षरशः झुंबड उडालेली असते. जवळपास २० गावांसाठी राबवण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या रेवस प्रादेशिक नळपाणी योजनेवरील हे शेवटचे गाव असल्याने इथल्या नळाला कधी पाणी पोहोचतच नाही. पाण्याचा दुसरा उद्भव नाही. त्यामुळे पाणीटंचाई या गावाच्या पाचवीलाच पुजलेली आहे. वर्षानुवर्षे हे असंच सुरू आहे. पिण्याबरोबरच अन्य वापरासाठीदेखील पाणी विकत घ्यावं लागतं. एका पिंपासाठी ८० ते २०० रूपये मोजावे लागतात. कधीकाळी नळाला पाणी आलंच तर ते भरण्यासाठी अक्षरशः उड्या पडतात आणि त्यातून वादाचे अनेक प्रसंग उद्भवतात. दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

शासनातर्फे सध्या जलजीवन मिशन अभियान राबवले जात आहे. परंतु बोडणीकरांना त्याचा काहीच लाभ होताना दिसत नाही. गावात नळ आहेत, पण त्यांना पाणीच नाही. विहीर आणि तलावाचे पाणी दूषित आहे दुसरा उद्भव नसल्याने केवळ नळाच्या पाण्यावरच अवलंबून रहावे लागते. जलजीवन मिशन अंतर्गत दरडोई ५० ते ५५ लीटर पाणी पुरवण्याचे धोरण आखण्यात आले आहे. परंतु ही योजना राबवणारी यंत्रणा असलेली रायगड जिल्हा परिषद यात सपशेल फेल ठरली आहे. बोडणी गावात गेली अनेक वर्षे पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. बोडणीकरांच्या पाण्याची समस्या सुटली पाहिजे.



# 'सीकेटी'त राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२५ जानेवारी १९५० रोजी भारतीय निवडणूक आयोगाची संस्थापना झाली, तर शासनाने सन २०११पासून २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचे जाहीर केले. लोकशाहीत मतदाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हा संदेश महाविद्यालयीन युवकांमध्ये रुजविण्यासाठी, मतदार नोंदणीचे गांभीर्य पटवून देण्याकरिता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त दर्जाप्राप्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून नुकतेच (दि. २५) महाविद्यालयीन संकुलात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, कोकण परिक्षेत्रातील उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संजय जगताप, पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर, महापालिका उपायुक्त विठ्ठल डाके यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व विषद करीत महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांनी मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देत मतदार नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित केले. तहसीलदार विजय तळेकरांनी एका मताच्या मूल्याबाबत चर्चा करीत मतदान नोंदणी प्रक्रिया व त्याची पूर्तता करणाऱ्या आवश्यक दस्तऐवजांविषयीची इत्यंभूत माहिती दिली.

कोकण परिक्षेत्राच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. संजय जगताप यांनी लोकशाही शासन व्यवस्थेचे महत्त्व समजावून सांगत त्याचे व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासात असणारे योगदान उद्धृत करून पुढे सांगितले की, भारताची तरुणांचा देश म्हणून ओळख असून अशा उदयोन्मुख राष्ट्राचा पाया हा जागरूक आणि जबाबदार मतदार आहे. त्यामुळे मतदार साक्षरता व नोंदणीविषयीचे उपक्रम सभोवतालच्या परिसरात प्रसिद्ध होणे अगत्याचे आहे.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांच्या संबोधनात, व्यक्तीच्या व्यक्त होण्यावर भर दिला. व्यक्तीचे व्यक्त होणे गरजेचे असून व्यक्ती व्यक्त झाल्याशिवाय त्याच्या समस्यांचे निराकरण होणे नाही, असे ते म्हणाले. याचबरोबर त्यांनी युवकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. मतदानाची प्रक्रिया समजावून सांगताना त्यांनी अनेक ऐतिहासिक संदर्भ दिले. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी लोकशाहीच्या दोन्ही चाकांचे समान पद्धतीने कार्यान्वयन होणे गरजेचे असून मतदार व राज्यकर्ते यांच्या समन्वयातूनच भारतीय लोकशाही यशस्वी होईल, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

मान्यवरांच्या संबोधनानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित बहुविध स्पर्धांच्या विजेत्यांची घोषणा करीत संबंधित विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पदेऊन गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सत्कारानंतर समग्र उपस्थितांना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी जागरूक मतदाराची शपथ देऊ केली व उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमास मान्यवर अतिथींसमवेत महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर, ग्रंथपाल प्रा. रमाकांत नवघरे, कला शाखाप्रमुख डॉ. बी. एस. पाटील, रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बी. व्ही. जाधव आदी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे, प्रा. सत्यजित कांबळे, डॉ. योजना मुनिव, प्रा. सागर खैरनार, प्रा. आकाश पाटील, प्रा. अपूर्वा ढगे, सांस्कृतिक समन्वयक प्रा. गणेश जगताप यांनी विषेश परिश्रम घेतले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थचे चेअरमन, माजी खासदार रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

## सिडकोच्या नव्या गृहनिर्माण योजनेचा शुभारंभ; ऑनलाइन अर्ज नोंदणी सुरू

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या नव्या गृहनिर्माण योजनेस ७३व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि. २६) प्रारंभ करण्यात आला. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस सुरुवात झाली आहे. या योजनेंतर्गत नवी मुंबईतील तळोजा नोडमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण प्रवर्गातील नागरिकांकरिता ५,७३० घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी व्हिडीओद्वारे शुभेच्छा दिल्या.

सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी या योजनेविषयी माहिती देताना, नवी मुंबईतील वेगाने विकसित होत असलेल्या आणि उत्तम कनेक्टिव्हिटी लाभलेल्या तळोजा नोडमध्ये परवडणाऱ्या दरातील ५,७३० घरे उपलब्ध करून देत असल्याचे सांगून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्त सिडको भवन येथे एमडी डॉ. संजय मुखर्जी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सहव्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल, डॉ. कैलास शिंदे, विभागप्रमुख व अधिकारी या वेळी उपस्थित होते.



**पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त मोरावे जि. प. प्राथमिक शाळेत कोविड योद्धा केशव घरत (सफाई कामगार) यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.**


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




पनवेल महानगरपालिका हद्दीत
शुक्रवार, दि. २८ जानेवारी २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड
सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. क्रीडा संकुल, एच.ओ.सी., पनवेल
- ३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ४. सिडको सामाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. निमिषा हेल्थ सेंटर (पमपा), खारघर
- ४. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

ग्रामीण लसीकरण

- टेंभोडे रा.जि.प. शाळा
- तोंडरे वरचा पाडा रा.जि.प. शाळा
- भोईर पाडा रा.जि.प. शाळा
- पेठाली रा.जि.प. शाळा
- देवीचा पाडा रा.जि.प. शाळा
- भिंगारी रा.जि.प. शाळा
- फणसवाडी
- कांदेवाडी
- खांदा गाव प.म.पा. शाळा
- नागझरी रा.जि.प. शाळा

# जिथे एक कमळ फुलते, तिथे अनेक कमळे फुलतात -दरेकर

## पोलादपूरच्या नगरसेविका अंकिता जांभळेकर यांना माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने चंचूप्रवेश केल्याची चर्चा होत असली, तरी नगरसेविका अंकिता जांभळेकर यांच्या पाठीशी संपूर्ण राज्य आणि केंद्रातील भाजप ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीत भाजपच्या अंकिता जांभळेकर निवडून आल्या. या ठिकाणी भाजपचे कमळ फुलल्याच्या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित नगरसेविका अंकिता जांभळेकर यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यावेळी फडणवीस यांनी जांभळेकर यांना शुभेच्छा दिल्या.



(छाया : शैलेश पालकर)

या वेळी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी, पोलादपूर नगरपंचायतीमध्ये प्रथमच कमळ फुलले असून जिथे एक कमळ फुलते तिथे अनेक कमळे फुलतात, असे सुतोवाच केले.

भाजपचे पोलादपूर तालुका अध्यक्ष प्रसन्ना पालांडे, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष महेश निकम, अनिल खेडेकर, राकेश गोसावी आदी उपस्थित होते.

# रायगडातील पहिला हापूस आंबा मुंबई बाजारात रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदाच्या हंगामात रायगड जिल्ह्यातून मुंबई बाजारात पहिला हापूस आंबा पाठविण्याचा मान अलिबाग तालुक्याला मिळाला आहे. तालुक्यातील नारंगी येथील बागायतदार एस. के. मँगोजचे मालक वरूण संजयकुमार पाटील यांनी प्रजासत्ताक दिनी प्रत्येकी दोन डझनाच्या पाच पेट्यांची काढणी करून आंबा मुंबई बाजारात पाठवला आहे. शिवाय एक केशरची पेटीही मुंबई बाजारात रवाना झाली आहे.

यंदादेखील आंबा बागायतदारांवर निसर्गाने अवकृपा केली आहे. सातत्याने बदलत्या हवामानाचा फटका आंबा पिकाला बसतो आहे. अवेळी पडणारा पाऊस, खराब हवामान, पिकांवर येणारे आजार अशा प्रतिकुल परिस्थितीवर मात करून वरूण पाटील यांनी यशस्वीरित्या आंब्याची काढणी करून जिल्ह्यातून पहिला आंबा बाजारात पाठवण्याचा मान पटकावला आहे. हा आंबा त्यांनी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वाशी बाजारात पाठवला आहे. सुरूवातीला हापूसला डझनाला १० हजार रूपयांपर्यंत भाव मिळू शकतो, असे वरूण पाटील यांनी सांगितले.

### अलिबागच्या वरुण पाटील यांना मिळाला मान



**ऑक्टोबर आणि डिसेंबरमध्ये अवकाळी पाऊस झाला. आम्ही योग्य फवारणी करून मोहर वाचवला. त्यामुळे आंबा लवकर तयार झाला. आपल्याकडील आंब्याला सुरुवातीला चांगला भावही मिळतो. सध्या डझनाला १० हजार रुपये इतका भाव मिळू शकतो.**

**–वरुण पाटील, आंबा बागायतदार, नारंगी, ता. अलिबाग**

# रायगडात प्रजासत्ताक दिन विविध कार्यक्रमांनी साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारताचा ७३वा प्रजासत्ताक दिन रायगड जिल्ह्यात बुधवारी (दि. २६) मोठ्या उत्साहात साजरा झाला. पोलीस मुख्यालय, रायगड जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, तहसील कार्यालय, नगर परिषद कार्यालय, नगर पंचायत कार्यालये, सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

अलिबाग येथील पोलीस कवायत मैदानावर पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल





यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा नियोजन अधिकारी ज. द. मेहत्रे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, सुषमा सातपुते, स्नेहा उबाळे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले आदींसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक यावेळी उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ध्वजारोहणानंतर पोलीस दलाच्या पथकाने राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. या वेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणात पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी राज्य घटनेच्या उद्देशिकेचे सामुहीक वाचन करण्यात आले. कठीण व खडतर परिस्थितीत चांगली कामगिरी करणारे रसायनी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक धनाजी काळे यांचा दुधे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी पोलीस अधिकारी, अंमलदार व कर्मचारी हजर होते.

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त खालापूर तालुका रा. स्व. संघाने बुधवारी खोपोलीत आयोजित भारतमाता पूजन कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले.

खोपोली शहरातील दीपक चौकात आयोजित केलेल्या या कार्यक्रमास रा. स्व. संघाचे संपर्क प्रमुख राकेश पाठक, खालापूर तालुका कार्यवाह अविनाश मोरे, शहर कार्यवाह दीपक कुवळेकर, शहर संपर्क प्रमुख सुधाकर भट, खोपोली भाजप अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अजय इंगुळकर, उपाध्यक्ष पुनित तन्ना, महिला मोर्चाच्या स्नेहल सावंत, सुनिती महर्षी, विमल गुप्ते, राष्ट्रसेविका समितीच्या माधवी कुवळेकर, व्यापारी



(छाया : विनायक माडपे)

सेलचे कीर्ती ओसवाल, ज्येष्ठ स्वयंसेवक गोखले, पांडे, वामन दिघे यांच्यासह संघ परिवारातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी दीपक कुवळेकर व भाजप कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

नागरी कृती समितीनेही बुधवारी पहाटे खोपोलीतील श्रीराम मंगल कार्यालयात याच स्वरूपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी झेंडावंदन करण्यात आले.

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**


तालुक्यात ७३व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्याच्या निमित्ताने होत असलेले विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम कोरोनामुळे रद्द करण्यात आले होते. केवळ एनसीसीच्या विद्यार्थ्यांचे संचलन करण्यात आले. तालुक्यातील प्राथमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांमध्ये कोरोनाच्या सावटाखाली ध्वजारोहण करण्यात आले.

कर्जत शहरातील पोलीस मैदानात उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, पंचायत समितीमध्ये सभापती सुषमा ठाकरे यांनी ध्वजारोहण केले. नगर परिषद कार्यालायातील ध्वजारोहण सोहळा नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. तहसील कार्यालयात तहसीलदार विक्रम देशमुख, कर्जत पोलीस ठाण्यात निरीक्षक सुवर्णा पत्की, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, न्यायालयात न्या. मनोद तोकले, इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये डॉ. अनिरुद्ध जोशी, अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेमध्ये संस्थेचे कार्यवाह जनार्दन मोघे, कर्जत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शिरीष पाटील, अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. मोहन काळे, भिसेगावमधील आंबेभवानी माध्यमिक विद्यालयात माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर, वरई ग्रामपंचायतीमध्ये सरपंच सुरेश फराट, शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघात दत्तात्रेय भोईर यांनी ध्वजारोहण केले. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सुदाम कार्ले, सहकारी भात गिरणीत अरुण लाड यांनी धवजारोहण केले.

**आगळावेगळा उपक्रम**

*दाहिवली येथील स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतन विद्यालयात नुकतेच भारतीय सैन्य दलात दाखल झालेला माजी विद्यार्थी बाबू नाईक याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी कार्याध्यक्ष मुकुंद मेंढी, प्रा. नितीन आरेकर, राजेश लाड, रजनी गायकवाड यांच्यासह शिक्षक, ग्रामस्थ व ग्रामस्थ उपस्थित होते.*

## श्रीवर्धन बीएसएनएल कार्यालयात ध्वजवंदन झालेच नाही!



(छाया : भारत चोगले)

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त भारत संचार निगम (बीएसएनएल) च्या श्रीवर्धन कार्यालयात दरवर्षी ध्वजवंदन केले जाते, मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे यंदा तेथे ध्वजवंदन झाले नाही.

बीएसएनएलच्या श्रीवर्धन येथील कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वज फडकवण्यासाठी खांब उभा करण्यात आला आहे. तेथे दरवर्षी स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनी ध्वजवंदन केले जाते. मात्र या वेळी तेथे राष्ट्रध्वज फडकविण्यात आला नाही. या कार्यालयाला बुधवारी टाळे लावलेले होते. तेथील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते उपलब्ध झाले नाहीत.



**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा चौक या संस्थेच्या सारंग (ता. खालापूर) विद्या मंदिर शाळेत बुधवारी संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. आविनाश देशामुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, सचिव योगेंद्र शहा यांच्यासह शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी शाळेतील विद्यार्थीनी प्रगती ठोंबरे व विद्यार्थी वेदांत ठोंबरे यांनी राष्ट्रभक्तीपर गीते सादर केली.

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्या मंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये बुधवारी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी आरएसपी शिक्षक कुंभार व विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख, कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, संचालक कॅ. विठ्ठलराव कदम, सदस्या ऐश्वर्या जोशी, शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, उपमुख्याध्यापिका कांता पुजारी, पर्यवेक्षक दिलीप मोळीक यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. अनिल बडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




### कागदपत्रे हरविलेबाबत

**श्री. प्रविण रंगराव मोरबाळे,** साई प्लाझा, ए-विंग ४०२, एमटीएनएल ऑफीसजवळ, पनवेल, जि. रायगड यांचेकडून पनवेल परिसरात प्रवास करीत असताना खालील कागदपत्र दिनांक २५/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक २६/०१/२०२२ रोजी नोंद केली आहे.

**हरविलेले कागदपत्र : मालमत्ता ओळख खरेदी दस्त क्र. ९९२८/२००६ (३७/३७)**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास श्री. प्रविण रंगराव मोरबाळे यांचेकडे आणून द्यावे अथवा ९७६८३९१०१५ या नंबरवर संपर्क साधावा.

दि. २७/०१/२०२२

सही/-
**श्री. प्रविण रंगराव मोरबाळे**
साई प्लाझा, ए-विंग ४०२, एमटीएनएल ऑफीसजवळ, पनवेल, जि. रायगड

### झलक को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.

(Regd. No. : N.B.O.M/CIDCO/HSG(OH)3321/JTR/YEAR 2010-2011)

### जाहीर नोटीस

**झलक कॉ.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. प्लॉट नं. १७३/१८२, सेक्टर ९, नवीन पनवेल (पूर्व)** या सोसायटींच्या इमारतींना रंगरंगोटीचे (कलर) काम व इतर कामे करावयाची आहेत, तरी इच्छुक निविदाधारकांनी इमारतीची पहाणी करून निविदा देणेत यावी.

**इमारत रंगरंगोटी कामाचे स्वरूप**

१. इमारतचे कंपाऊंड, गेट, भिंत यांचे रंग काम करणे.
२. इमारतीमधील क्रॅक तोडून काढणे.-फिलींग करणे
३. इमारतीमधील सर्व विंडोच्या ग्रीलला कलर करणे.
४. इमारतीमधील बाथरूम टॉयलेट पाईप खराब असल्यास दुरुस्ती किंवा नवीन बसविणे.
५. दोन्ही टेरेस पत्र्यांना आतील बाजूस सफेद रंग लावणे. (ए विंग बी विंग)
६. दोन्ही टेरेसच्या लोखंडी छताला रेड ऑक्साईड मारून कलर करणे.
७. बी विंग टेरेस पत्रांना नाली बसून पाणी गटार मार्गे पाईप लाईनला जोडणे.
८. दोन्ही विंगच्या टेरेसच्या फ्लोरिंगला सिमेंट कोबा करणे.
९. कलरची पूर्ण कामे झाल्यावर सोसायटीचे नाव, रजिस्टर नंबर मराठी व इंग्रजीत काढण्यात यावे.
१०. निविदा दोन प्रकार मध्ये द्यावी.- संपूर्ण लागणारे मटेरियल सहित व फक्त मंजुरीबाबत असावी.
११. ज्याची निविदा मंजूर होईल त्याला काम देण्यात येईल त्यांच्या सर्व कामगारांचा विमा असावा.

**अटी व शर्ती**

१. जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून निविदा सोसायटीच्या पत्त्यावर ७ दिवसांमध्ये सादर करावी.
२. निविदा संबंधीची इतर माहिती निविदा मंजुरीच्या पत्रामध्ये देण्यात येईल.
३. निविदा नाकारणे किंवा स्वीकारणे अधिकार सोसायटी राखून ठेवत आहे.

दिनांक : २७/०१/२०२२ **झलक को. ऑप. हौ. सोसायटी, लि.**

सही/- अध्यक्ष | सही/- सचिव

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. एकनाथ बाळाराम तांडेल** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे-कर्नाळा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५९/१क | ०-१७-५० पो. ख. ०-०२-२० **एकूण ०-१९-७०** | ३.३२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्र व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २५/०१/२०२२.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, जि. रायगड
दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. संजय नारायण चव्हाण, श्रीमती दिपिका दिपक चव्हाण** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे-कल्हे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३० | ०-२५-८० पो. ख. ०-०१-८० **एकूण ०-२७-६०** | ५.३१ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्र व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. २५/०१/२०२२.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, जि. रायगड
दूरध्वनी क्र. : २७४५६३०६





पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रयत शिक्षण संस्थेच्या कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले, तसेच जि. प. मराठी शाळेत अनंताशेठ ठाकूर, गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रघुनाथशेठ घरत आणि गव्हाण ग्रामपंचायतीच्या आवारात सरपंच माई भोईर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. विविध ठिकाणच्या या ध्वजारोहण कार्यक्रमाला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील, वसंत म्हात्रे, विश्वनाथ कोळी, कोपर गाव अध्यक्ष सुधीर ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, संजय भगत, वसंतशेठ पाटील, किशोर पाटील, अशोक कडू, भार्गव ठाकूर, माजी सरपंच जिज्ञासा कोळी, ग्रामपंचायत सदस्य सदस्य सचिन घरत, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, अरुण कोळी, पंकज पाटील, योगिता भगत, शिल्पा कडू, उषा देशमुख, सुनिता घरत, कामिनी कोळी, गिरिजाबाई कातकरी, ग्रामविस्तार अधिकारी एम. डी. पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर गव्हाण ग्रामपंचायतीच्या सभागृहात ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.



पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त भाजपच्या मध्यवर्ती कार्यालय येथे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या ध्वजारोहण झाले. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहर अध्यक्ष जयंत पगडे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष सचिन पाटील, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, उपमहापौर सीताताई पाटील, प्रभाग सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक मनोहर म्हात्रे, तेजस कांडपिळे, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, राजेश्री वावेकर, रूचिता लोंढे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, महिला मोर्चा शहराध्यक्ष वर्षा नाईक आदी उपस्थित होते.




कामोठे : प्रजासत्ताक दिनानिमित्त भाजपच्या कार्यालयात पनवेल महापालिका प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा भगत आणि सुषमा पाटील विद्यालयात सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष रवी जोशी, नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, दिलीप पाटील, नगरसेवक कुसुम म्हात्रे, भाजप भटके विमुक्त महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष विद्या तामखडे, भाजप नेते प्रदीप भगत, गोपीनाथ गोवारी, आर. जी. म्हात्रे, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, उपाध्यक्ष चिन्मय समेळ, नाना मकदूम, शरद जगताप, विनोद खेडकर, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष वनिता पाटील, मनीषा वनवे, सुरेखा लांडे, वर्षा शेलात, अनिता शेट्टी, सुनिता शर्मा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त न्हावे ग्रामपंचायत कार्यालय, तसेच न्हावाशेवा पोलीस ठाणे येथे सरपंच हरेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी उपसरपंच मंजुषा ठाकूर, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, जितेंद्र म्हात्रे, हनुमान भोईर, माजी उपसरपंच किसन पाटील, सदस्य सागरशेठ ठाकूर, प्रल्हाद पाटील, देवेंद्र भोईर, साधना तांडेल, निर्मला ठाकूर, कल्पना घरत, अमृता पाटील, विजया ठाकूर आदी उपस्थित होते.



पनवेल : प्रजासत्ताक दिनानिमित्त गव्हाण शिवाजीनगर येथील प्राथमिक शाळेत ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, टी. के. ठाकूर, शिरीष कडू, वैभव ठाकूर, जितेंद्र कडू, नितीन ठाकूर, शशिकांत ठाकूर, नारायण ठाकूर, वीरेंद्र ठाकूर, किशोर ठाकूर, लक्ष्मण ठाकूर, दिलीप ठाकूर, राजेंद्र ठाकूर, धनंजय ठाकूर, विजय ठाकूर, गजानन ठाकूर यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.






## विंडीजविरुद्ध मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखिल भारतीय निवड समितीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी एकदिवसीय आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. मर्यादित षटकांचा नियमित कर्णधार रोहित शर्माचे पुनरागमन झाले असून तो दोन्ही मालिकेचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

भारतीय संघ ६ फेब्रुवारीपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे, तर टी-२० मालिका १६ फेब्रुवारीपासून कोलकात्याच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळवली जाईल. माजी कर्णधार विराट कोहली या दोन्ही मालिकेत खेळणार आहे, तर दुखापतीमुळे रवींद्र जडेजा दोन्हीसाठी उपलब्ध नाही.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com